MHBH070009302024

दाखल दिनांक :- १८/०९/२०२४

नोंदणी दिनांक :-१८/०९/२०२४

निकाल दिनांक :- २०/०६/२०२६

कालावधी **:-** ०१ व**,** ०९ म**,** ०२ दि**.**

**भाग– अ**

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२), पवनी, जि. भंडारा यांचे न्यायालय.

## (पिठासिन अधिकारी व्ही.आर.फरकुंडे)

| | |
|---|---|
| **सं.फौ.प्र.क्र.५२१/२०२४** | **निशाणी क्र.१०** |
| **अपराध क्रमांक–१६१/२०२४,** | **दिनांक २१/०६/२०२४** |
| **पोलिस ठाणे – अडयाळ, तालुका–पवनी, जिल्हा –भंडारा.** | |
| **फिर्यादी/तक्रारकर्ता** | **महाराष्ट्र शासन.**<br>तर्फे – पोलीस ठाणे अडयाळ,<br>ता. पवनी, जि. भंडारा.<br>**मुळ फिर्यादी–भूमेश्वर शिंगाडे,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>रा. पोलीस स्टेशन अडयाळ, तालुका–पवनी, जिल्हा– भंडारा. |
| **सरकार पक्षातर्फे वकील.** | **एन. के. गजभिये (सहाय्यक सरकारी वकील).** |
| **आरोपी.** | **चंद्रशेखर जयदास पचारे,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय – मजुरी.<br>रा. नेरला, तालुका – पवनी, जिल्हा– भंडारा. |
| **आरोपीतर्फे वकील.** | **के. एम. जिभकाटे.** |

**भाग - ब**

## गुन्हयाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | २१/०६/२०२४ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | २१/०६/२०२४ |
| ३. | दोषारोपपत्र दाखल तारीख | १८/०९/२०२४ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | १७/०६/२०२५ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | २३/०७/२०२५ |
| ६. | निकालासाठी राखीव ठेवल्याची तारीख | १५/०६/२०२६ |
| ७. | निकाल तारीख | २०/०६/२०२६ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | निरंक. |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपी चे नाव | आरोपी अटक तारिख | आरोपीस जामीन दिल्याची तारिख | गुन्हा | आरोपीस शिक्षा दिली / निर्दोष मुक्तता | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चंद्रशेखर जयदास पचारे | दिनांक २१/०६/२४ रोजी सुचनापत्रावर सोडले. | दिनांक ०५/०५/२५ | म. जु. प्रतिबंध अधिनियम कलम १२(अ) | निर्दोष मुक्त केले. | नाही. | निरंक |

## न्या य नि र्ण य

## (आज दिनांक २०/०६/२०२६ रोजी)

**१.** आरोपी चंद्रशेखर जयदास पचारे याच्या विरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध

अधिनियमाचे कलम १२ (अ) अंतर्गतची प्रस्तुत संपरीक्षा आहे.

२. सरकारपक्षाची हकीकत नुसार दिनांक २१/०६/२०२४ रोजी मुखबीरकडून मिळालेल्या खबरेनुसार फिर्यादीने दोन पंचासह मौजा नेरला, जि. भंडारा येथे रेड घातली असता आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन मटक्याचे आकडे सट्टापट्टी कागदावर लिहुन जुगार खेळ खेळवितांना मिळुन आला. सबब फिर्यादीने आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा नोंद केला.

३. या गुन्हयाचा तपास ग्रेट पो.उप.नि.हेमराज सोरते यांनी केला. त्यांनी त्यांच्या तपासात साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि आरोपीविरुध्द पुरावा आल्याने अंतिम अहवाल सादर केले. तसेच प्रस्तुत प्रकरणात पो. हवा. भुमेश्वर शिंगाडे यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केले.

४. आरोपीविरुध्द **निशाणी क्रमांक १०** अन्वये दोषारोप ठेवले होते. त्यामधील मजकुर त्याला वाचून व समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे स्पष्ट करुन सदर खटला चालविण्याची तयारी दर्शविली होती. सरकारपक्षातर्फे **आरोपीविरुध्द** खटला सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार आणि फिर्यादी यांना तपासण्यात आले. दिनांक ०९/०२/२०२६ रोजीच्या **निशाणी क्रमांक ०१** वरील आदेशानुसार सरकारपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब **निशाणी १०** खाली नोंदविण्यात आला. त्याचा जबाब पूर्णपणे नकारात्मक असून सदर खटल्यात त्याला नाहक गोवण्यात आले आहे असे त्याचे म्हणणे आहे.

५. विद्वान सहाय्यक सरकारी वकील एन. के. गजभिये आणि आरोपीतर्फे विद्वान वकील के. एम. जिभकाटे यांचा युक्तीवाद ऐकला.

**६.** सबब एकूण हकीकत व युक्तीवाद पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष पुढील कारणाप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष सिध्द करतात काय की, दिनांक २१/०६/२०२४ रोजी १८:०० वाजेच्या सुमारास मौजा नेरला, ता. पवनी, जि. भंडारा येथे आरोपीने सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन मटक्याचे आकडे सट्टापट्टी कागदावर लिहुन जुगार खेळ खेळवून महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमाचे कलम १२(अ) अन्वये गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम निकालाप्रमाणे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता –</u>**

**७.** फौजदारी कायद्यानुसार आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्याची जबाबदारी संपुर्णपणे सरकारपक्षावरती असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी हा घटनेच्या दिवशी सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच जिथे सर्व लोकांचा वावर असू शकतो अशा ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी जुगार खेळत होता ही बाब सरकारपक्षाने संशयापलीकडे शाबीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता सरकारपक्षातर्फे आरोपीविरुध्द खटला सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार रघुपती शंकर भोगे **(सा.क्र.१)** आणि फिर्यादी भूमेश्वर शिंगाडे **(सा.क्र.२)** यांची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे.

**८.** सरकारपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेले पंच साक्षीदार शंकर भोगे

(सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांना फोन करुन पंचनाम्याकरीता बोलावले होते आणि त्यांच्यासमक्ष सट्टापट्टी पकडली होती. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामे तयार करून त्यावर त्यांच्या सहया घेतल्या होत्या.

९. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथन केले आहे की, घटनास्थळावर गेले असता त्यांना कोणतेही इसम सट्टापट्टी जुगार खेळताना आढळुन आले नाही. घटनास्थळ पंचनामा सायंकाळी ०५:३० ते ०६:०० वाजेच्या दरम्यान तयार करण्यात आला होता. तसेच घटनास्थळ आणि जप्ती पंचनाम्यांवर सहया त्यांनी एकाचवेळेस केल्या होत्या. बचावपक्षाच्या ईतर सूचना त्यांनी नाकारलेल्या आहेत.

१०. सरकारपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेले फिर्यादी भूमेश्वर शिंगाडे (सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे कथन केले आहे की, घटना दिनांक २१/०६/२०२४ रोजी घडली होती. त्यादिवशी पहेला येथे प्रोहीबीशन रेडकामी त्यांची डयुटी लागली होती, मौजा नेरला येथे पेट्रोलींग करीत असताना त्यांना मुखबीराद्वारे खबर मिळाली होती की, आरोपी चंद्रशेखर हा मौजा नेरला येथील गांधी वार्डात पानठेल्याच्या मागे वरली मटक्याचे आकडे लिहुन सार्वजनिक ठिकाणी हारजीतचा जुगार खेळ खेळत आहे. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना सुचनापत्र देऊन बोलावले आणि पंचासमक्ष घटनास्थळी रेड केली असता घटनास्थळी एक इसम मिळुन आला. पंचासमक्ष त्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात एक पांढरा कागद ज्यावर वरली मटक्याचे आकडे लिहुन होते मिळुन आला. त्याच्या ताब्यात एक निळया शाईचा डॉट पेन, नगदी २८५/– रुपये असा एकूण २९० रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा केला. तसेच त्यांनी पोलीस स्टेशन अडयाळ येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

११. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथन करून मान्य केले

आहे की, गुन्हा दाखल होण्याच्या पूर्वीच घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा तयार करण्यात आले होते. घटनास्थळ आणि पोलीस स्टेशनमधील अंतर ३ कि.मी. आहे. बचावपक्षाच्या ईतर सूचना त्यांनी नाकारलेल्या आहेत.

**१२.** पटलावरील पंच साक्षीदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष सट्टापट्टी पकडली होती. परंतु ती सट्टापट्टी कोणाच्या ताब्यातून पकडली होती याबाबत त्यांनी कोणतेही कथन केलेले नाही. तसेच बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथन केले आहे की, घटनास्थळावर गेले असता त्यांना कोणतेही इसम सट्टापट्टी जुगार खेळताना आढळून आला नाही. तसेच घटनास्थळ पंचनामा सायंकाळी ०५:३० ते ०६:०० वाजेच्या दरम्यान तयार करण्यात आला होता परंतु घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.१३) चे अवलोकन केले असता घटनास्थळ पंचनामा हा ०६:०० ते ०६:३० वाजेपर्यंत करण्यात आला असे नमूद आहे. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा सदर पंचासमक्ष करण्यात आला किंवा नाही हे स्पष्ट होत नाही. अशा परिस्थितीत सदर साक्षीदाराच्या कथनावर भर देणे न्यायोचित वाटत नाही.

**१३.** पटलावरील फिर्यादी यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, त्यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळावर रेड केली असता घटनास्थळी एक इसम मिळुन आला व त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात एक निळया शाईचा डॉट पेन, एक पांढरा कागद आकडे आणि नगदी २८५/– रुपये असा एकूण २९० रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा केला. परंतु पंच साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले आहे की, घटनास्थळावर गेले असता त्यांना कोणतेही इसम सट्टापट्टी जुगार खेळताना आढळून आले नाही. यावरुन घटनास्थळावर आरोपी जुगार खेळ खेळत होता ही बाब स्पष्टपणे सिध्द होत नाही. याशिवाय प्रस्तुत

प्रकरणात घटनेच्यावेळी हजर असलेले दुसरे पंच नामे शंकर ठाकरे यांनी सरकारपक्षाच्या हकीकतीस कोणतेही सहकार्य केले नाही त्यामुळे सरकारपक्षातर्फे त्यांना गिव्हनअप करण्यात आले.

**१४.** पटलावरील साक्षीदारांच्या साक्षपुराव्यांवरुन घटनेच्या दिवशी आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन जुगाराचा खेळ खेळत होता या निष्कर्षापर्यंत पोहोचले जाईल अशी पुराव्याची साखळी पूर्ण होत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेल्या गुन्हयाचे तात्वीक अंग सरकारपक्ष पुराव्याअभावी सिध्द करु शकले नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

**१५.** घटनेच्यावेळी आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेली नगदी रक्कम २८५/– रुपयांची आरोपीने अथवा ईतर कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर जप्त २८५/– रुपये नियमाप्रमाणे सरकार जमा करण्यात येवुन गुन्हयातील मुल्यहीन मुददेमाल नियमाप्रमाणे नष्ट करणे आवश्यक आहे. सबब मी मुद्दा क्रमांक २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी चंद्रशेखर जयदास पचारे याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमाचे कलम १२(अ) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** गुन्हयात जप्त करण्यात आलेला मुल्यहीन मुद्येमाल अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात येवुन जप्त केलेली रोख रक्कम रुपये २८५/– सरकार जमा करण्यात यावी.

**४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे ५,०००/– रुपयांचा वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

स्वा/–
**(व्ही.आर.फरकुंडे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,**
**पवनी.**

**दिनांक – २०.०६.२०२६.**
**ठिकाण – पवनी.**

**भाग - क**

**साक्षीदारांचा तपशील**

**सरकार पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | रघुपती शंकर भोगे | पंच |
| स.सा.क्र.२ | भूमेश्वर खुशांत शिंगाडे | फिर्यादी |

**आरोपी पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

**न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

सं. फौ.ख.क्र.५२१/२०२४
सरकार –वि–चंद्रशेखर

## सरकार पक्षातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१३ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | नि.क्र.१४ | जप्ती पंचनामा |
| ३ | नि.क्र.१७ | पंचांना दिलेले सूचनापत्र |
| ४ | नि.क्र.१८ | फिर्याद |
| ५ | नि.क्र.१९ | छापील प्रथम खबर अहवाल |

## आरोपीतर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

## न्यायालयातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

## महत्वाच्या वस्तु/(मटेरिअल ऑब्जेक्ट).

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | अंतिम अहवाल रकाना क्र.१० नुसार अनु.क्र.१ ते ३ अन्वये वर्णन असलेले मुद्देमाल. |

स्वा/–
**(व्ही.आर.फरकुंडे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,**
**पवनी.**

**दिनांक – २०.०६.२०२६.**
**ठिकाण – पवनी.**

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Judicial Magistrate F. C. (Court No.2) Pauni. |
| Name of the Steno | : | Rohini Kumbhalkar, Steno (Grade-3). |
| Judgment date | : | 20/06/2026 |
| Judgment signed by P.O. on | : | 20/06/2026 |
| Judgment uploaded on | : | 20/06/2026 |

*****